# आदिम जमाती बहुल क्षेत्रात तीन सुक्ष्म नियोजन केंद्र उभारणी

महाराष्ट्र राज्यात कातकरी, कोलाम व माडिया या आदिम जमातींचे वास्तव्य आहे. या जमाती शेती, वनउपज आणि विविध प्रकारची मजुरी यावर उपजिविका करतात. या समाजाच्या विविध समस्या व गरजा आहेत. सदर गरजा व समस्या आणि त्यांच्या विकासाच्या कल्पना लक्षात घेउन आदिम समाजाचा विकास गतिमान करणे आवश्यक झाले आहे. यासाठी विविध विकास घटकांची,सांस्कुतिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक इत्यादि बाबींची सद्यस्थितीदर्शक माहिती संकलन व अहवाल निर्मिती, समस्यांची माहिती व त्या निवारणार्थ उपक्रम निश्चिती करणे या करिता, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (TRTI) यानी राज्यामधील कातकरी, कोलाम व माडिया आदिवासी बहुल क्षेत्रात तीन सूक्ष्म नियोजन केंद्र उभारणीचे काम युनिसेक मॅनेजमेंट सर्विसेस प्रा. लि. या कंपनीस दिले आहे.

या प्रत्येक केंद्रांतर्गत प्रत्येक आदिम जमातीकरिता पुढीलप्रमाणे स्वतंत्र घटक कार्यक्रम राबविण्यात येतील.

१. रोजगार, स्वयंरोजगार विषयक पाहणी करुन प्रभाग तालुकानिहाय रोजगार, स्वयंरोजगार आराखडा तयार करणे.
२. युवा/महिला मंच, संस्था/कम्पनी स्थापना व नोंदणी या करिता इच्छुक युवक, युवती, महिला यांना आवश्यक प्रशिक्षण देणे अथवा उपलब्ध करुन देणे.
३. उपजीविका साधन विषयक अभ्यास व त्यानुसार अहवाल सादरीकरण.
४. वनहक्क अधिनियम अंतर्गत जनजागरण मेळावा आयोजन, वनहक्क अंतर्गत कार्यरत कर्मचारी प्रशिक्षण, ग्रामस्तरावरील वनहक्क समिती सदस्य प्रशिक्षण.
५. पेसा अधिनियम अम्मलबजावणी जनजागरण मेळावा आयोजन, पेसा क्षेत्रातील पंचायत राज लोकप्रतिनिधी प्रशिक्षण.
६. क्षेत्र समन्वयक, ग्राम साथी प्रशिक्षण
७. क्षेत्र समन्वयक, ग्राम साथी कामकाज मुल्यांकन
८. आदिम जमाती संदर्भातील विविध संशोधन प्रकल्प हाती घेणे.
९. सखोल संशोधनावर आधारित आदिम जमाती विकास धोरण मसुदा निर्मिती व सादरीकरण.
१०. संस्कुती व संवर्धन विषयक पुस्तिका तयार करणे.
११. शैक्षणिक सद्यस्थिती व त्यामध्ये अपेक्षित सुधारणा विषयक अहवाल तयार करणे.
१२. आदिम जमातीच्या पारम्पारिक ज्ञानाचा अभ्यास करुन त्यावर पुस्तिका तयार करणे.
१३. शासकीय आश्रमशाळा/अनुदानित आश्रमशाळा/एकलव्य निवासी शाळा(EMRS) या मधील आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांचे दाखले प्राप्तीसाठी प्रस्ताव तयार करणे, सक्षम प्राधिकारी याना सादर करणे त्याचप्रमाणे, प्राप्त जमात प्रमाणपत्र पडताळणीकरिता सम्बंधित समितीस प्रस्ताव सादर करणे इत्यादि कामे सेवानिवुत्त अनुभवी कर्मचारी पथक गठित करुन त्यांचे मार्फत कामकाज करुन घेणे.
१४. आदिम जमाती समस्या संदर्भात प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपक्रम निश्चिती विषयक कामकाज करणे.
१५. आदिम जमाती व्यक्ती व कुटुम्बाना आजतागायत मिळलेला लाभ व त्याची फलनिष्पत्ती अहवाल निर्मिती

# आदिम जमाती बहुल क्षेत्रात तीन सुक्ष्म नियोजन केंद्र उभारणी

## उद्घाटन सोहळा क्षणचित्रे

### अ. शहापुर केंद्र




उद्घाटन दिनांक २४/०५/२०२२

उद्घाटक – मा. तेजस्विनी गलांडे

सहायक प्रकल्प अधिकारी एकात्मक आदिवासी विकास प्रकल्प शहापुर.

## ब. यवतमाळ केंद्र




उद्घाटन दिनांक २५/०५/२०२२

उद्घाटक – मा. श्री. गो.भा.सोनार, सहायक प्रकल्प अधिकारी (प्रशासन)

एकात्मक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा जि. यवतमाळ

क.गडचिरोली केंद्र




उद्घाटन दिनांक २७/०५/२०२२

उद्घाटक – मा.श्री प्रभू सादमवार

सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विभाग, गडचिरोली